Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**January-2020**

**SPECIAL ISSUE-CCI**

# भारताच्या जडणघडणीत विचारवंताचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Anil D. Warghat
Associate Professor
Govt.College
of Education
Buldana Dist-Buldana

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar P

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

***Multidisciplinary International Research Journal***

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

January -2020

**SPECIAL ISSUE - CCI**

## भारताच्या जडणघडणीत विचारवंताचे योगदान



**Chief Editor**

Prof.Virag S.Gawande

Executive Editor:

Dr.Anil D. Warghat

Editor :

Dr.Dinesh W.Nichit

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
January 2020

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Multidisciplinary International Research Journal

### Peer-Reviewed Indexed

**January - 2020**

**SPECIAL ISSUE - CCI**

## विचारवंताचे भारताच्या जडणघडणीत योगदान

Chief Editor :
Dr. Virag.S.Gawande
Editor :
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.
Executive-Editors :
Dr.Anil D. Warghat
Govt.College of Education, Buldana Dist-Buldana

**Aadhar International Publications**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 225/-

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**

**Director,**

Aadhar Social Research &,

Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible.for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

**Email :** aadharpublication@gmail.com**Website :**www.aadharsocial.com**Mobile:**9595560278



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार — प्रा.झरेकर आर.एस. | 1 |
| 2 | महिला सक्षमीकरण : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान — प्रा.डॉ. वामन ए. खोब्रागडे | 5 |
| 3. | आचार्य विनोबा भावे यांचे भूदान ते ग्रामदान या चळवळी विषयीचे मत — प्रा.विलास मेश्राम | 10 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांची वर्तमान उपयुक्तता — विक्की अशोक रामटेके | 15 |
| 5 | महात्मा गांधीं आणि स्त्रीसक्षमीकरण — डॉ.वर्षा गंगणे | 20 |
| 6 | शेडयुल्ड कास्ट फेडरेशन — प्रा. मंगेश वाहाणे | 27 |
| 7 | महात्मा फुले यांचा राजकीय विचार: एक ऐतिहासिक अभ्यास — प्रा डॉ नितीन उल्हासराव सराफ | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी, उद्योगविषयक विचार — प्रा. वसुंधरा दत्ताराम साळुंखे | 38 |
| 9 | भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीचे स्थान — सहा.प्रा.एम.बी.रेवतकर | 42 |
| 10 | अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : सावित्रीबाई फुले — प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 47 |
| 11 | संत गाडगेबाबांचा शैक्षणिक दृष्टिकोन — डॉ.प्रवीण घारपुरे | 53 |
| 12 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचा ग्रामगीतेतील ग्रामिण विकासातील सहभाग व कार्य — प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 57 |
| 13 | महात्मा गांधी के आर्थिक विचार — प्रा. डॉ.ए.बी.पटले | 61 |
| 14 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार: एक दृष्टीक्षेप — डॉ.उज्ज्वला पाटील | 65 |
| 15 | शाहूमहाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान — प्रा.डॉ.सतिश हरलाल पारधी | 70 |
| 16 | भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरण विषयक विचाराचे व कार्याचे योगदान — प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | 73 |
| 17 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार — डॉ.मीना काळेले | 77 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबिल — प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | 80 |
| 20 | राष्ट्रसंतांची 'आदर्शग्राम' संकल्पना — प्रा. डॉ. सिद्राम किशनराव मुंडे | 84 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार — प्रा. मनोहर आनंदराव गुडधे | 92 |





Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : सावित्रीबाई फुले

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभाग प्रमुख श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर – ४४१ १०४

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रियामध्ये ज्याचे अग्रक्रमाने नाव घेतले जाते त्यामध्ये सावित्रीबाई फुले यांचे स्थान वरच्या दर्जाचे आहे पण साहित्यिक म्हणून त्यांच्या साहित्याकडे दुर्लक्ष्य केले जाते. साहित्याच्या क्षेत्रातही सावित्रीबाईंनी केलेल्या साहित्य कर्तृत्वाची विविधता उलघडण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

**जीवन :**

१८ व्या शतकाच्या पूर्वाधामध्ये पेशवाई संपून इंग्रजी सत्ता आपली पाळेमुळे मजबुत करीत होती. पेशवाच्या काळात अत्यंत अंदाधुंदी पसरली होती. राजकारणामध्ये कुणीही कुणाचे वर्चस्व मानीत नव्हते. समाजाची घडी विस्कटलेली होती सांस्कृतिकदृष्ट्याही एकनिष्ठता नव्हती या सर्व दुफळीचा फायदा इंग्रजांना होत होता. वर्ग, वर्ण, जात, धर्म यांच्यातील विषमतेने दुर्गुणाचे टोक गाठले होते. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे खंडोजी व लक्ष्मीबाई नेवासे राहत होते. त्यांना सिदुजी, सावित्री, सखाराम व श्रीपती अशी अपत्ये होती.

सावित्रीबाईचे वय ९ वर्षे व ज्योतीरावाचे वय १३ वर्षे असतांना सगुणाबाईच्या मध्यस्थीने त्यांचा विवाह इ.स. १८४० मध्ये झाला. याच सावित्रीबाईच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू त्यांच्या जीवन व साहित्याच्या आधारे दिसून येतात. सावित्रीबाईच्या जीवनापासून प्रेरणा घेवून सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, वैद्यकीय, न्यायसंस्था अशा विविध क्षेत्रामध्ये कार्य करणारे कर्तबगार व्यक्ती होवून गेल्या व सतत होत आहेत व राहतील इतके महत्त्वपूर्ण कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले म्हणून त्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्हणून राजमान्यता व समाजमान्यता मिळाली. सावित्रीबाईचा जन्म ३ जानेवारी १८३१ चा असून हा दिवस 'स्त्री मुक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो.

**वेशभूषा :**

सावित्रीबाईचा जन्म खेड्यत झालेला होता. लहानपणापासून कष्ट करण्याची सवय असल्यामुळे शरीर– यष्टीने काटक दिसायच्या. विवाहानंतर गळ्यामध्ये साधी पोत व मंगळसूत्र घालायच्या. कपाळावर मोठे कुंकू लावायच्या. ग्रामीण, शेतकरी व सुसंस्कारीत स्त्रीला साजेल असे त्यांचे साधे राहणीमान होते.

**सावित्रीबाईचे साहित्य वाङ्मय:**

सावित्रीबाईच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करावयाचा असल्यास खालील साहित्य वाङ्मयाद्वारे करता येईल.

(१) पत्रे, (२) भाषणे, (३) काव्यफुले (काव्यसंग्रह) (१८५४),
(४) बावनकशी सुबोध रत्नाकर (काव्यसंग्रह) (१८९२)



Scanned with OKEN Scanner

सावित्रीबाईनी लिहिलेल्या साहित्यापैकी अत्यंत मोजके वाङ्मय साहित्य उपलब्ध असून काही साहित्य काळाच्या पडद्यामध्ये गडप झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महात्मा ज्योतीराव फुले यांच्या साहित्यामधूनही सावित्रीबाईच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू उलगडता येतात. सावित्रीबाई फुले यांनी लिहिलेल्या पत्रापैकी तीन पत्रे उपलब्ध असून त्यापैकी एक पत्र त्यांनी १० आक्टो. १८५६ ला ज्योतीराव फुले यांना नायगाववरून लिहिले असून यामध्ये शिक्षण विषयक विचार सांगितले आहेत.

सावित्रीबाई फुले ह्या शिक्षिका, मुख्याध्यापिका होत्या त्यामुळे विविधप्रसंगी समाजामध्ये जागृती करतांना मार्गदर्शन करीत होत्या. महात्मा फुल्यांच्या मृत्युपश्चात सावित्रीबाईकडे सत्यशोधक समाजाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी आली त्यामुळे अध्यक्ष या नात्यानेही त्यांनी या परिवर्तनाच्या चळवळीला भाषणांच्याद्वारे मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणाचे विषय खालीलप्रमाणे आहेत.

(१) विद्यादान (२) उद्योग (३) सदाचरण (४) कर्ज (५) व्यसने

सावित्रीबाईनी शिक्षणाचे महत्त्व लहानपणापासून ओळखले होते. विवाहानंतर ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी दिलेला ख्रिस्ती चरित्र ग्रंथ त्यांनी माहेरवरून सोबत आणल्याने आपल्याला लिहिता—वाचता जरी येत नसले तरी चित्ररुपाने त्या ग्रंथाचा परिचय करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो तसेच त्यांच्या मनामध्ये शिक्षणाबद्दलचे कसे आकर्षण होते याची पूर्वकल्पना येते.

" विद्या धन आहे रे । श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन" [१]

'श्रेष्ठधन' या कवितेमध्ये त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले. स्वत: शिक्षणाचे महत्त्व ओळखले असल्यामुळेच म. फुल्यासारखांचा शिक्षण प्रेमी मिळाल्यानंतर या बीजाचे वटवृक्षामध्ये रुपांतर व्हायला वेळ लागली नाही.

उद्योगाचे (१) विचारी उद्योग (२) अविचारी उद्योग असे दोन प्रकार सांगितले. उद्योग हा जीवनाला आवश्यक मानले. क्रियाशील व्यक्ती हा उद्योगाशिवाय राहू शकत नाही अन्यथा तो आळशी बनेल. उद्योगाचा विचार करतांना तो सकारात्मकतेकडे जाणारा उद्योग त्यांना अभिप्रेत आहे. त्यातून व्यक्तिला अर्थप्राप्ती होते व समाज उन्नतीस सहकार्य केले जाते. आपल्या शरीराचा, इंद्रियाचा वापर करून उद्योगातून पैसा मिळविला जातो व उद्योगाने मनुष्य व समाज प्रगतीशील बनतो. उदा. अभ्यास. अविचारी उद्योगामध्ये चोरी करणे, भिक मागणे यांचा समावेश केला हे उद्योग अधोगतीकडे नेणारे आहेत म्हणून यांना अविचारी उद्योग म्हटले.

**शेतकऱ्याबद्दलचा आदर :**

म. ज्योतीबा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' लिहून आपले संपूर्ण जीवनच परिवर्तनाच्या चळवळीला वाहून घेतले होते. सावित्रीच्या मनामध्ये शेतकऱ्याबद्दलचा असणारा स्नेहभाव, त्यांच्या कवितेतून व्यक्त होतो.

ब्रम्हा असे शेती । अन्नधान्य देती
अन्नास म्हणती । परब्रम्ह
जे जे करीती शेती । विद्या संपादती
तथा ज्ञानवंती । सुखी करी

सदाचरण व व्यसने :

सदाचरण म्हणजे सत् असे आचरण ठेवणे. जीवनामध्ये सदाचरणाला अत्यंत महत्त्व आहे. विद्याप्राप्त मानवाचे आचरण योग्य नसेल तर त्याच्या शिक्षणाला काहीही महत्त्व उरत नाही. उलट निरीक्षर असणाऱ्या माणसाचे आचरण योग्य असेल तर तो मनुष्य संत, महात्मा, देवत्व अशा पायऱ्यावर पुढे पुढे जातो. जीवनातून सदारण उणे केले तर शुन्य शिल्लक राहते इतके सदाचरणाला महत्त्व आहे.

व्यसने ही मानवाची शारीरिक व सामाजिक प्रतिष्ठा घालवितात. व्यसनाधिन मानवाची कुचेष्ठा केली जाते त्याची व त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. व्यसनाप्रमाणे कर्ज ही हानीकारक असतात कर्ज घेतलेला माणूस दिवसेंदिवस कर्जाच्या ओझ्याखाली भरडल्या जातो व त्याच्या संसाराचा नाश होतो.

कवयत्री सावित्री :

सावित्रीबाईनी 'काव्यफुले' हा कविता संग्रह १८५४ पूर्वी लिहिला आहे. आधुनिक कवितेचे जनक म्हणून ज्यांना सन्मान दिला जातो त्या कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत यांच्या कविता १८८५ पासूनच्या आहेत. स्त्री पुरुष असा भेदाभेद न करता व इंग्रजी साहित्याची प्रेरणा अशा स्वरूपाचे निकष लावले नाही तर सावित्रीबाई फुले या 'आधुनिक काव्याची जननी' ठरतात. पतीच्या ग्रंथनिर्मिती पूर्वीच १८५४ मध्ये 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा सन्मान मिळविल्यामुळे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना खऱ्या अर्थाने 'आधुनिक काव्याची जननी' म्हटले पाहिजे. त्यांच्या 'काव्यफुले' या संग्रहात ४१ कविता असून 'बावनकशी सुबोध रत्नाकर' यामध्ये ६ कविता आहेत. त्यांच्या एकूण कविताची संख्या ४७ असली तरी त्यामध्ये वैविधता दिसून येते. सावित्रीबाईनी शिक्षणाचे महत्त्व, निसर्ग, सामाजिक—ग्रामीण जीवन, शोषीत—शेतकरी यांची स्थिती अशा विविध विषयांवर काव्यलेखन केले. त्यांनी संस्कृतप्रचूर रचनेपेक्षा साध्या सोप्या बोली भाषेत काव्यरचना केल्या. श्रेष्ठ 'धन', 'इंग्रजी शिका', 'शुद्राचे परावलंबन', 'शिक्षणासाठी जागे व्हा', 'अज्ञान' अशा कवितामधून शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

'शुद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व । पशुत्व हटते पहा'

शुद्राचे दु:खणे या कवितेत वरील विचार मांडला आहे. 'पिवळा चाफा', 'गुलाबाचे फुल', 'फुलांची कळी', 'जाईचे फुल', 'फुलपाखरु' अशा कितीतरी निसर्गकविता आहेत.

सुंदर माझी बाहुली । नाव तिचे आहे सोनुली
उचलून तिला हळू घेते । नजरेपुढती मी धरते
हसू लागली
फुलून गेली
बोलू लागली
खेळ ग ताई मी वदली..... सुंदर माझी बाहूली...

'बोलकी बाहुली' कवितामधून बालकांशी हितगुज सावित्रीबाईनी साधले आहे.

गुलामगिरीविरूद्ध क्रांती :

सावित्रीबाई स्त्रियांची गुलामगिरी मान्य नव्हती जिथे संधी असेल तिथे त्यांनी त्याविरूद्ध आपले मत व्यक्त केले. 'सामुदायिक संवाद'मध्ये म्हणतात—



Scanned with OKEN Scanner

'सरस्वतीच्या दरबारात शिक्षण घ्यायास जावू चला,
विद्या देवीस प्रसन्न करुनी वर मागु तिजला चला ।
अज्ञानाची, दारिद्र्याची गुलामगिरी तोडू चला,
युगायुगाचे जीवन असले फेकून देवू चला चला।।

हजारो वर्षाची अज्ञानाची परंपरा झुगारून लावण्यासाठी स्त्री—पुरुषांना सावित्रीबाईंनी प्रोत्साहित केले. हे सामाजिक कार्य करीत असतांना त्यांनी 'मनू म्हणे', 'इंग्रजी शिका', 'बळीचे स्तोत्र', 'शुद्राचे दुखणे', पेशवाई, आंग्लाई अशा सामाजिक कवितामधून समाज प्रबोधन केले. अज्ञानी, निरक्षर, परावलंबी, शोषित, कष्टकरी, मजूर, शेतकरी यांना आपल्या काव्य व भाषणाद्वारे समाज परिवर्तनासाठी प्रवृत्त केले. त्यांच्या कवितांची संख्या अल्प असली तरी काव्यगुणांनी श्रेष्ठ अशा कविता सावित्रीबाईंनी लिहिल्या.

पतीविषयी आदर :

''अडाणी जनांना असे कर्णधार
तयांना असे देतसे सद्‌विचार
कृती वीर होता तसा ज्ञानयोगी
स्त्रिया शुद्रासाठी सदा दुःख भोगी''[२]

म. फुल्यांच्या विचारांना संपूर्ण जग प्रभावित आहे. परंतु घरातील व्यक्तीकडून सन्मानपत्र, शाबासकी मिळणेही आवश्यक आहे. सावित्रीबाईंनी आपले पती करीत असलेल्या कार्याचा गौरव वरील कवितेतून केला आहे.

शिक्षण विषयक विचार :

शिक्षण विषयक विचार व्यक्त करतांना 'शिक्षण' या कवितेतून फुल्यांनी मांडलेले विचार खालीलप्रमाणे.

''शुद्राना सांगण्याजोगा आहे शिक्षणमार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हारते पहा.''[३]

सामाजिक कार्याचे प्रेरणास्रोत :

सावित्रीबाईना मराठीच्या सोबत कानडी, उर्दू, मोडी लिपी या भाषा येत होत्या. त्यांनी म. फुल्याच्या अतिप्राचीन काळी, गुलामगिरी, इतिहास, सुधारणूक या भाषणांचे संपादनाचे कार्य १८५६ मध्ये केले. फुले कुटुंब व मोरो विठ्ठल वाळवेकर यांचा कुटुंबाचा 'घरोबा' होता. वाळवेकर 'गृहिणी' हे मासिक चालवायचे. त्यामध्ये सावित्रीबाईंनी विधवाविवाह, स्त्री शिक्षण, बालविवाह, जातीभेद निर्मूलन या विषयावर लेखन केले. सावित्रीबाई लहानपणी आपल्या आईला स्वयंपाकामध्ये मदत करणे, वडिलांना शेतात मदत करणे, येणाऱ्या पाहुण्याचे स्वागत करणे असे कार्य करीत होत्या. त्याच संस्काराचा फायदा त्यांना जीवनात समाजउपयोगी कार्य करतांना झाला. विधवा व परित्यक्ताना सहकार्य करणे, मागासवर्गीय मुलीसाठी शाळा चालविणे, अनाथ बाल—बालिकाश्रम चालविणे, शुद्रांना व शुद्रेतरांना सहकार्य करणे, वाट चुकलेल्या स्त्रियांची प्रसुती करणे, प्लेगच्या साथीमध्ये रुग्णांची सेवा करणे, अस्पृश्यासाठी घरातील पाण्याचा हौद खुला करणे, विधवा विवाहास प्रोत्साहन देणे, विवाहावरील खर्चावर बंधने आणणे, पुरोहिताविना विवाह करणे, बालहत्या प्रतिबंधक गृह चालविणे, बालसंगोपन करणे अशा विविध कार्यामुळे सावित्रीबाई या समाजसेवा करणाऱ्या



Scanned with OKEN Scanner

अमर समाजसेविका बनल्या व पुढच्या पिढीसाठी प्रेरणास्रोत झाल्या. त्यांच्या कार्यप्रेरणेतून शिक्षण, राजकारण, वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कितीतरी लोकांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्गदर्शक ठरतात. एखाद्या बीजापासून एक झाड निर्माण होते आणि त्या झाडाला अनेक फळे लागतात त्याचप्रमाणे सावित्रीबाईंच्या प्रेरणेतून विविध क्षेत्रात महिला शक्तीचा उदय झाला.

**जाणीव जागृतीचे काव्य :**

''कोण तुडली । कळी फुलांची
जुनी विसर । नवीन पाही
रीत जनाची । उत्शृंखल ही
पाहुनिया मी । स्तिमित होई ''[४]

वरील विचार फुलांच्याबद्दलचे त्यांनी व्यक्त केले आहेत. त्यांनी पिवळा चाफा, जाईचे फुल, जाईची कळी, गुलाब फुल या कवितांचे शिर्षक त्यांचे निसर्गप्रेम व्यक्त करणारे आहे.

**महिलांचे प्रेरणास्रोत :**

सावित्रीबाईंच्या प्रेरणेतून पंडिता रमाबाई रानडे यांनी 'शारदा सदन' मधून स्त्री सुधारणेसंबंधी कार्य केले. रमाबाई रानडे यांनी 'सेवासदन'द्वारे आरोग्य, स्त्रीयांचे अधिकार यावर प्रकाश टाकला. आनंदीबाई जोशी यांनी डॉक्टर होवून स्त्री आरोग्यासंबंधी विशेष कार्य केले. त्यांना पहिल्या महिला डॉक्टर म्हणून सन्मान दिला जातो. ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री–पुरुष तुलना' या ग्रंथ मराठी साहित्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असा मौलिक ठेवा आहे.

सामाजिक क्षेत्रामध्ये सिंधुताई सपकाळ या अनाथ मुलांचे संवर्धन करतात त्यांना 'अनाथांची आई' म्हटले जाते. मेधा पाटकर या नर्मदा बचाव आंदोलनातून पुढे आलेले नेतृत्व असून विषमता, अन्याय याविरूद्ध कार्य करीत आहेत. सीमा साखरे या स्त्रीयांच्या हक्कासाठी लढा देत आहेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉ. मंदा प्रकाश आमटे, डॉ. स्मिता रवींद्र कोल्हे, डॉ. राणी अभय बंग या महिला आदिवासी भागामध्ये आरोग्यसेवेचे कार्य करीत आहेत. राजकीय क्षेत्रामध्ये कमला नेहरू, इंदिरा गांधी यांच्यापासून तर भारताच्या (माजी) पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यापर्यंत विविध महिला कर्तृत्वाची क्षेत्रे गाजवित आहेत.

**समारोप :**

क्रिडा, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक अशा बहुविध क्षेत्रामध्ये स्त्रीया जे कार्य करीत आहेत त्यामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा मिळाली आहे. भारतामध्ये स्त्रीयांचा जो इतिहास लिहिला जाईल यामध्ये सावित्रीबाईंचे स्थान ध्रुव ताऱ्यासारखे अढळ आहे. 'स्त्री मुक्ती चळवळीच्या आद्य प्रणेत्या' या शब्दात प्रा.गं.बा. सरदार यांनी, 'आधुनिक काव्याच्या जननी' असे प्रा.ना.ग. पवार यांनी गौरवोद्गार काढलेले आहेत, 'क्रांतिकारक मूल्य व्यक्तिगत जीवनात स्वीकारणारे म. ज्योतीराव फुले हे पहिलेच महामानव असून त्यांच्या अंगिकृत कार्यात सर्वांशिने सावित्रीबाईंनी सहभाग घेतला' असे बाबा आढाव यांनी म्हटले आहे. आदर्श कन्या, आदर्श भगिनी, आदर्श माता, आदर्श सासू, आदर्श पत्नी कर्तव्यदक्ष सहधर्मचारिणी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना १० मार्च १८९७ ला देवाज्ञा झाली. परंतु कार्यारूपाने त्या अमर आहेत. जनतेने मनामनातून थोर भारतरत्नाचा सन्मान मिळणाऱ्या सावित्रीबाईंना शतशः प्रणाम!



Scanned with OKEN Scanner

संदर्भ टिपा :

१) पवार ना.ग. —‘ क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले’— ’, भारती प्रकाशन १२७५, सदाशिव पेठ, पुणे ३०( प्रथमआवृती १९९५) (किंमत.रू १२) (पृ. २७)

२) पवार ना.ग. —‘ क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले’— ’, भारती प्रकाशन १२७५, सदाशिव पेठ, पुणे ३०( प्रथमआवृती १९९५) (किंमत.रू १२) (पृ. २७)

३) पवार ना.ग. —‘ क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले’— ’, भारती प्रकाशन १२७५, सदाशिव पेठ, पुणे ३०( प्रथमआवृती १९९५) (किंमत.रू १२) (पृ. २८)

४) webdunia.com/article/Marathi poet/savitribai fule‘‘सावित्रीबाई फुले : जाणीव जागृतीचे काव्य’’

संदर्भ ग्रंथ :—

१) (संपा.) साळुंखे पी.बी., माळी मा.गो., प्रधान ग.प्र.— ‘महात्मा फुले गौरव ग्रंथ’ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.

२) हनवते डॉ. शोभा— ‘सावित्रीबाई फुले यांची समग्र कविता’, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३) पवार ना.ग. ‘सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व’ पद्गंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे—३५.

४) mr.wikipedia.org/wiki/ सावित्रीबाई फुले

५) webdunia.com/article/Marathi-poet/savitribai fule

६) maharastatimes.indiatimes.com

Scanned with OKEN Scanner

# तुमच्या Ph.D. प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर करून मिळेल, व ते जगभर पोहोचेल...

**More Details – 9595560278,**




**THESIS**
**DISSERTATION**
**PROJECT**
**CONVERT INTO BOOK**


SJIFactor

Scientific Journal Impact Factor

## CERTIFICATE OF INDEXING (SJIF 2020)

This certificate is awarded to

**Bahujan Aadhar**
**(ISSN: 2278-9308)**

The Journal has been positively evaluated in the SJIF Journals Master List evaluation process
SJIF 2020 = 7.675

**SJIF (A division of InnoSpace)**

SJIFactor Project Manager
International Advisory Services
INNOSPACE INTERNATIONAL

SJIFactor Project

Scanned with OKEN Scanner